**मुख्य कार्यालय, विरार**
**विरार (पुर्व),**
**ता. वसई, जि. पालघर, पिन 401 303.**

**दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890**
**फॅक्स : 0250-2525107**
**ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com**

**जावक क्र: व.वि.श.म./ /  /२५-२६**
**दिनांक : 12/08/2025**

## वसई-विरार शहर महानगरपालिका

### “हर घर तिरंगा” मोहिमेअंतर्गत तिरंगा ध्वज व राष्ट्रीय स्वातंत्र्य दिनासंबंधीच्या आवश्यक वस्तू विक्रीचे स्टॉल विविध ठिकाणी सुरू

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत केंद्र शासनाकडून सन २०२२ पासून “हर घर तिरंगा” ही मोहीम सुरु करण्यात आली आहे. लोकांच्या हृदयात देशभक्तीची भावना जागृत करणे तसेच भारतीय राष्ट्रध्वजाबद्दल जागरुकता वाढविणे हा या मोहिमेचा मूळ उद्देश आहे. सन २०२५ मध्ये सुद्धा “हर घर तिरंगा” ही मोहीम मोठ्या उत्साहात राबविणेत येत आहे.

या मोहिमेअंतर्गत सर्व नागरिकांनी दि.०२ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट या कालावधीत भारताचा तिरंगा ध्वज आपल्या घरावर, इमारतींवर, आस्थापनांवर फडकविणे व राष्ट्रीय सन्मानाचे विविध कार्यक्रमात सहभागी होण्याचे आवाहन महानगरपलिकेमार्फत करण्यात आले आहे.

वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रा अंतर्गत  तिरंगा ध्वज, राष्ट्रीय स्वातंत्र्य दिनासंबंधी आवश्यक इतर वस्तू, तसेच लहान मुले, शाळा यांना आवश्यक असणारे साहित्य व वस्तू, तिरंगा रंगाच्या थीमच्या वस्तुंची (माळा/दिवा/कपडे/हस्तकला इ.) विक्रीसाठी स्टॉल उभारण्यात आले असून दि.१२, १३ व १४ ऑगस्ट २०२५ (तीन दिवस) या कालावधीत महिला बचत गटामार्फत बाजार पेठेचे आयोजन करण्यात आले आहे. तरी नागरिकांनी सदर बाजारपेठेला भेट द्यावी. व “हर घर तिरंगा” या राष्ट्रभक्तीने प्रेरित अभियानात सर्व नागरिकांनी सहभागी होऊन आपले तिरंग्याविषयीचे प्रेम अभिव्यक्त करण्याचे आवाहन वसई विरार शहर महानगरपालिकेतर्फे करण्यात येत आहे.

बाजारपेठ ठिकाणे:

१)कॅपिटल मॉल समोर, नालासोपारा (पूर्व)

२)डिमार्ट समोर, यशवंत नगर, विरार (पश्चिम)

३)वसई विरार शहर महानगरपालिका, नवीन इमारत, मुख्यालयासमोर, विरार (पश्चिम)

४) डिमार्ट जवळ, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व)